# जाहिरात

## जिल्हा निवड समिती, रायगड-अलिबाग

जाहिरात क्रमांक : मशा/जमीन/अ-३/वहका/जिल्हा अंम.व्यवस्थापक/२०१७

दिनांक ०२/०६/२०१७

---

मा. आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांचेकडील पत्र क्र.वहका-२०१७/प्र.क्र.१७७/का.३(७)/२७१६ दि.१५/०४/२०१७ च्या पत्रान्वये मा.राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांचे अधिनस्त निधीतुन सामुहिक वनहक्क प्रकरणांत चालना देऊन त्यांचे व्यवस्थेत रुपांतर करण्यासाठी जिल्हास्तर अंमलबजावणी व्यवस्थापकांचे पद भरुन त्यांचेमार्फत अनुसूचित जमाती व पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८, व सुधारणा नियम २०१२ अंमलबजावणी या विषयाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. सदर वनहक्क कायदा अंमलबजावणीकामी व्यवस्थापक म्हणुन मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने नेमणुक करण्यास मा.आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी निर्देश दिले आहेत.

उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यात अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ अंमलबजावणी करीता मानधन तत्वावर करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या **जिल्हास्तरावर - १ "वनहक्क कायदा अंमलबजावणी व्यवस्थापक"** या पदासाठी विहित अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांची निवड करण्यासाठी **राजस्व सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग** येथे **दिनांक १२/०६/२०१७** रोजी सकाळी **१०.०० वाजता <u>WALK IN INTERVIEW</u>** पध्दतीने निवड प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यासाठी खालील विहीत अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी **दि.१२/०६/ २०१७ रोजी सकाळी १०.००** वाजता समक्ष उपस्थित रहावे.

**<u>शैक्षणिक अर्हता :-</u>**

१) शासनमान्य विद्यापिठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर.
२) व्यवस्थापन पदव्युत्तर पदवी MBA/ MPM / MSW यांना प्राधान्य राहील.
३) संगणकाचे ज्ञान आवश्यक. MS-CIT (शासनमान्य प्रमाणपत्र)

**<u>मानधन :-</u>**

**जिल्हास्तर अंमलबजावणी व्यवस्थापक -**

| | |
|---|---|
| Fixed component Honararium | रुपये २२,५००/-<br>( मानधन २०,०००/- + प्रवास खर्च प्रतीमहा रु.२,५००/-)<br>जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रतीमहा १० भेटी देणे अपेक्षित असून प्रती भेट रु.२५०/- नुसार रु.२५००/- च्या मर्यादेत राहील. |
| Incentive component | रु. ६२.५० (एका सामुहिक वनहक्क दावे प्रकरणासाठी) |

**<u>विशेष सूचना :-</u>**

१. उमेदवाराने सोबतच्या नमून्यात अर्ज करावा व त्यावर स्वतःचा पासपोर्ट आकाराचा अलिकडच्या काळात काढलेला फोटो चिकटवावा.
२. उमेदवार ज्या पदासाठी अर्ज करीत आहे, त्या पदासाठी वर नमुद केलेल्या अर्हतेबाबत आवश्यक त्या जोडलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती + छायाप्रती अर्ज छाननी करताना उपलब्ध करुन देणे बंधन कारक आहे.
३. परीक्षेसाठी उमेदवारांस स्वखर्चाने हजर राहावे लागेल. याकरीता प्रवास खर्च व इतर कोणताही खर्च अनुज्ञेय नाही.
४. सदर पदावरील नियुक्त्या मानधन करार पध्दतीने करण्यांत येणार असल्याने या पदावर गुणवत्तेनुसार नियुक्त करण्यात येणाऱ्या उमेदवारांस मानधनां व्यतिरिक्त इतर कोणतेही शासकीय लाभ मिळणार नाहीत.
५. उमेदवारांनी निवडीसाठी निवड समितीवर अप्रत्यक्ष / प्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यांना निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
६. आवश्यक ती अर्हता धारण करणाऱ्या उपलब्ध उमेदवारांमधून उपरोक्त पदासाठी मौखिक परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
७. निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार हे निवड समितीस राहतील.

८. वरील पदावरील नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्याने शासन, आदिवासी विकास विभाग व मा.आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांच्याकडील वेळोवेळी प्राप्त होणा-या सुचना / निर्देशाप्रमाणे त्यांची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल किंवा मुदतवाढ देण्यात येईल.

९. शासन, आदिवासी विकास विभागाकडील निर्णय क्रमांक राज्यमा २०१५/प्र.क्र.३६/का-१६ दि.३१/०३/२०१५ मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे वनहक्क कायदा अंमलबजावणी व्यवस्थापकांची कर्तव्य राहतील व त्यांनी सदर शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याची आहे.

१०. वनहक्क कायदा अंमलबजावणी व्यवस्थापक हे त्यांना नेमुन दिलेली कामे व कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ ठरल्यास कोणतीही नोटीस न देता, त्यांची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

**स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांच्या सहीची आहे.**

**जिल्हाधिकारी रायगड करिता**

## अर्जाचा नमूना

अर्ज नोंदणी क्र. :- ---------/२०१७

प्रति,
मा. जिल्हाधिकारी
रायगड - अलिबाग

**विषय :- अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ अंमलबजावणीबाबत.**
**जिल्हास्तर वनहक्क अंमलबजावणी व्यवस्थापक नेमणूकीबाबत . .**

संदर्भ :- आपल्याकडील जाहिरात क्र.मशा/जमीन/अ-३/वहका/जिल्हा अंम.व्यवस्थापक/२०१७ दिनांक ०२/०६/२०१७.

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीप्रमाणे **जिल्हास्तर वनहक्क अंमलबजावणी व्यवस्थापक** पदाकरीता अर्ज करीत असून, जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नाव | :- | |
| २) | पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता | :- | |
| ३) | जन्मदिनांक दि.१५/०५/२०१५ रोजी होणारे पूर्ण वय (अंकात) | :- | दिनांक --------- महिना --------- वर्ष -------<br>वर्ष---------------महिने---------दिवस-------- |
| ४) | संपर्काचा क्रमांक :- | :- | मोबाईल क्रमांक ------------------------<br>ई-मेल आय डी ------------------------ |
| ५) | लिंग :- | :- | पुरुष/ स्त्री |
| ६) | राष्ट्रीयत्व :- | :- | भारतीय/अभारतीय |
| ७) | शैक्षणिक अहर्ता :- | :- | |

**भाग - २**

| ८) | इतर आवश्यक माहिती | नको असेल ते खोडावे | माहितीचा तपशील येथे नमूद करावा. |
|---|---|---|---|
| अ) | संगणक अहर्ता परिक्षा उत्तीर्ण (MS-CIT) | होय /नाही | प्रमाणपत्राचा क्रमांक -<br>दिनांक - |
| ब) | शाळा सोडल्याचा दाखला/ जन्म तारखेचा दाखला जोडला आहे का ? | होय /नाही | दाखला क्रमांक-<br>दिनांक - |
| क) | कामाचा अनुभव असल्यास तपशील नमूद करावा व प्रमाणपत्र जोडावे | होय /नाही | |

### प्रतिज्ञापत्र

मी, असे प्रमाणित करतो / करते की, वरील अर्जात नमूद केलेली माहिती खरी व सत्य असून त्या पृष्ठर्थ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती सादर करीत आहे. वर दिलेली माहिती खोटी अथवा चूकीची आढळून आल्यास माझी निवड / नियुक्त रद्द होईल याची मला पूर्ण जाणीव आहे. निवड प्रक्रियेतील मा. जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील. त्याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

ठिकाण :-
दिनांक :- /०६/२०१७

आपला / आपली विश्वासू

( अर्जदाराची स्वाक्षरी )